# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कोल्हापूर शहरातील पंचगंगा नदीचे प्रदुषण कमी करण्याबाबत**

**(१) ५४४ (०५-०४-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.न्यायालयाने अनेकदा आदेश देऊनही कोल्हापूर शहरांतील २१ एम एल डी सांडपाणी दररोज विना प्रक्रिया पंचगंगा नदीत सोडण्यात येत असल्याने शहर तसेच १७४ गावात जलप्रदुषण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचगंगा नदीचे प्रदुषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दीर्घकालीन आणि तात्पुरत्या उपाययोजना करण्यासंबंधीचा सविस्तर आराखडा केंद्रीय प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पंचगंगा नदीचे प्रदूषण कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) कोल्हापूर शहरातील एकूण निर्माण होणा-या ९६ द.ल.लि. सांडपाण्यापैकी ९० द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. उर्वरित ६ द.ल.लि. नदीमध्ये जात असून त्यासाठी नाला अडविणे व वळविणे व प्रक्रिया करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत १७४ ग्रामपंचायती पैकी ३ ग्रामपंचायती हुपरी, हातकणंगले व शिरोळ यांचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झालेले आहे. उर्वरित १७१ गावांपैकी पंचगंगा नदीमध्ये सांडपाणी काहीप्रमाणामध्ये मिसळणाऱ्या ग्रामपंचायतींकडून सांडपाणी मिसळणा-या ठिकाणी साखळी बंधारे/सिमेंट बंधारे घालणे व त्यामध्ये आळू, कर्दळी सारख्या वनस्पतींची लागवड करणे, क्लोरिनेशन करणे व शेतीसाठी पुनर्वापर स्वरुपाच्या तात्पुरत्या उपाय योजना करुन पंचगंगा प्रदूषण मुक्तीसाठी प्रयत्न सुरु आहेत

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोव्हेंबर, २०१९ मध्ये प्रदूषण रोखण्यासाठी दिर्घकालीन आणि तात्पुरत्या उपाययोजना करण्यासंबंधीचा सविस्तर आराखडा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला आहे.

(३) उपरोक्त १ व २ नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण नगरपरिषदेमधील नारायण तलावाच्या संवर्धनाबाबत**

**(२) ४७९९ (०७-०४-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत चिपळूण नगरपरिषदेमधील नारायण तलावाच्या संवर्धनासाठी शासन निर्णय दिनांक ०७ मार्च, २०१९ अन्वये शासकीय मान्यता व निधी मंजूर झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये शासनाचा ८०% हिस्सा म्हणजे रुपये २.८० कोटी व नगर परिषद २०% हिस्सा म्हणजे रुपये ७०.० लाख अशा एकूण ३.५० कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाच्या संवर्धनासाठी प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर असून देखील प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) नारायण तलावाचे संवर्धन करणेसाठी चिपळून नगरपरिषदेद्वारे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार एन.एस. इंजिनिअरींग एनव्हायरनमेंटल सोलुशन्स, नवी मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने दिलेली प्रशासकीय मान्यता व शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेसाठी दिनांक २६/०६/२०१९ रोजीच्या मे. कौन्सिल पुढे अहवाल सादर करण्यात आलेला होता. एजन्सीने तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांप्रमाणे काही बदल करून घेण्यात यावे असा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार नियुक्त एजन्सी कडुन सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये सुधारणा करण्याचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील औद्योगिक परिसरातील घातक रसायनयुक्त**
**पाणी गोदावरी** नदीपात्रात थेट मिसळत असल्याबाबत

**(३) ९११२ (२९-०५-२०२०). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील औद्योगिक परिसरातील घातक रसायनयुक्त पाणी गोदावरी नदीपात्रात मिसळत असल्याचे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अंतर्गत स्थापन केलेल्या समितीच्या पाहणीतून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, सदर समितीने केलेल्या पाहणीत सातपूर आणि अंबड या एमआयडीसी भागातील नैसर्गिक नाल्यांमधील पाणी रसायनयुक्त असल्याचे तसेच मल जल स्टॉर्म वॉटर पाइपमधून नाल्यामध्ये सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गंगापूरच्या प्रस्तावित मल जल प्रक्रिया केंद्रातून प्रक्रियायुक्त मल जल गोदावरी नदीत न सोडता ते 'एमआयडीसी'ला औद्योगिक कामांसाठी पुरवून मल जलाची समस्या दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) गंगापूर मल जल प्रक्रिया केंद्रातून प्रक्रिया केलेले सांडपाणी औद्योगिक कामासाठी वापरण्याबाबतचा प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेला नाही. तथापि, अंबड व सातपूर औद्योगिक क्षेत्रातील धातू सदृश्य उद्योगामधून निघणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता ०.५० एमएलडी चे सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा (CETP) उभारण्याचे काम मे. सिईटिपी फाऊंडेशन, नाशिक यांच्यामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या शिरुर उपविभाग व उपविभागातील शाखा कार्यालयांचे विभाजन होण्याबाबत

**(४) १२११६ (१५-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या शिरुर उपविभाग व शिरुर उपविभागातील शाखा कार्यालयांच्या विभाजनाचा प्रस्ताव उर्जा विभागाच्या कार्यालयाकडे मंजूरीसाठी प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभाजनामुळे सद्य:स्थितीत असणाऱ्या महावितरणाच्या कार्यालयांवरील अतिरिक्त कामाचा भार कमी होणार असल्याने विज वितरणाच्या ग्राहकांना वेळेवर व योग्य रितीने सेवा देणे सोईचे होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०९-२०२१) :** (१), (२), (३) व (४) महावितरण कंपनीच्या शिरुर उपविभाग व त्याअंतर्गत शाखा कार्यालयांच्या विभाजनाचा प्रस्ताव मंजूरीसाठी महावितरण कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. महावितरण कंपनीच्या उपविभाग कार्यालयांच्या विभाजनाचे निकष विचारात घेता शिरुर उपविभागाचे विभाजन करण्यासाठी आवश्यक असलेले ग्राहकांचे निकष पूर्ण होत नाही. परंतु शिरुर शहर शाखा कार्यालयाचे विभाजनाचे निकष पूर्ण करत असल्याने त्या शाखा कार्यालयाच्या विभाजनाचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन आहे.

---

**टाकरखेड हेलगा व मेरा बु (ता. चिखली जि. बुलडाणा) येथील सब स्टेशनचे काम सुरू करण्याबाबत**

**(५) १२५९७ (२५-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकरखेड हेलगा व मेरा बु (ता. चिखली जि. बुलडाणा) येथे पंडित दीनदयाळ योजनेअंतर्गत सब स्टेशनचे काम मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सब स्टेशनचे काम मंजूर होऊनही अद्यापपर्यंत काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सब स्टेशनचे काम सुरु न होण्यामागची कारणे काय आहेत, तसेच उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२१-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील बोईसर - तारापूर एमआयडीसी मधून सोडण्यात येणाऱ्या दुषित पाण्यामुळे मुरबा खाडीतील मासे मृत्युमुखी पडत असल्याबाबत**

**(६) १७४०२ (१९-११-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर - तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांकडून मुरबा खाडीत वारंवार सोडण्यात येणाऱ्या दुषित पाण्यामुळे मासे मृत्युमुखी पडत असल्याचे दिनांक १८ ऑक्टोंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित विभागांना वारंवार तक्रार करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याचे स्थानिक मच्छिमार बांधवांकडून संताप व्यक्त केला जात असून मा. पालकमंत्र्यांनी सदर कारखान्यांवर नियंत्रण ठेवून प्रदुषण रोखण्यासाठी एका महिन्याची मुदत दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक वसाहतीकरिता २५ mld cetp (common effluent treatment plant) मधून संपूर्ण प्रक्रिया झालेले पाणी samp २ मधून पुढे समुद्रात सोडले जाते, सदर औद्योगिक प्रक्रिया केलेले पाणी समुद्रामध्ये ७.१ किलोमीटर आतमध्ये सोडणे बंधनकारक असताना ते ५०० मीटरवर समुद्रामध्ये सोडले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार तारापूर औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जलप्रदूषणाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतून समुद्रात सोडण्यात येणारे सांडपाणी ५०० मीटरवर नवापूर येथील समुद्रात सोडण्यात येते. तथापि, सदर सांडपाणी समुद्रामध्ये ७.१ कि.मी. आतमध्ये सोडण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यापैकी ६.४ कि.मी. चे काम पूर्ण झालेले आहे.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योगांचे सन २०१९-२०२० मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानूसार दोषी आढळणाऱ्या १०२ उद्योगांवर तसेच सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेवर रु. १६० कोटी इतकी पर्यावरण नुकसान भरपाई देण्याबाबत डिसेंबर, २०१९ दरम्यान नोटीसा देण्यात आल्या होत्या. तसेच दोषी आढळलेले ९८ कारखाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बंद करण्यात आले होते.

• सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व्यवस्थित न चालविल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत क्र. ३३८/२०१०, २६१/२०१७ व १९६/२०१८ अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

• तारापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुन्हा पाहणी करण्याचे काम प्रगतीपथावर असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तीची पूर्तता न केल्यास सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बंद का करण्यात येऊ नये व या प्रक्रिया यंत्रणेत सांडपाणी सोडणाऱ्या उद्योगांना बंद का करण्यात येऊ नये याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानूसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यामध्ये कपात करण्यात आली आहे.

• दिनांक २२/११/२०२० पासून नवीन सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असल्यामुळे १७ द.ल.लि. पैकी ९ द.ल.लि. इतक्या सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया करण्यात येत आहे.

• जुन्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमध्येदेखील सुधारणा व अद्ययावतीकरण करण्याचे काम सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे सामुहिक सांडपाणी यंत्रणेने बंदी आदेश दिल्याने ७ ते ८ द.ल.लि. सांडपाणी निर्मिती कमी होऊन संबंधित उद्योगांनी स्वत: बंदी केलली आहे.

• तारापूर औद्योगिक परिसरातील प्रदूषणाच्या अनुषंगाने मा. हरित लवाद यांच्याकडे याचिका क्र. ६४/२०१६ दाखल प्रकरणी मा. लवादाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानूसार तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडा बनवून त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत नियुक्त विशेष शिक्षक व परिचर यांचे अन्य शाळेत समायोजन न केल्याबाबत**

**(७) १९९९४ (२५-११-२०२०). श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत सन २००९ नंतर नियुक्त विशेष शिक्षक व परिचर यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार तसेच मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार अन्य शाळेत समायोजन न केल्याबाबत तसेच वेतनाची थकबाकी अदा न केल्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथ/माध्य.) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत कार्यरत असलेले कोणते विशेष शिक्षक समायोजनासाठी पात्र आहेत हे निश्चित करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तपासणी पथक नेमण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समायोजन पात्रता निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तपासणी पथकाने अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समायोजन पात्रता निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तपासणी पथकाने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तसेच विशेष शिक्षकांच्या समायोजनाचा व थकीत नियमित वेतनाचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२३-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर केंद्र शासनाची योजना चालू असल्यामुळे सदर शिक्षकांचे इतर योजनेत समायोजनाचा प्रश्न उद्भवत नाही. केंद्रीय योजनेत चालू ठेवण्यासाठी सदर शिक्षक पात्र आहेत काय, हे निश्चित करण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या अध्यक्षतेखाली पथक नेमण्यात आले आहे.

(३) व (४) केंद्र शासनाच्या चालू योजनेतील दिव्यांग मुलांसाठी १३५८ विशेष शिक्षकांपैकी ९८३ विशेष शिक्षकांचा दस्तावेज तपासणीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यापैकी ३९४ इतक्या पात्र विशेष शिक्षकांना समग्र शिक्षा योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी तत्वावर पदस्थापना देण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हास व वालधुनी नद्या (जि. ठाणे) प्रदूषणमुक्त करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण मंडळ व निरी यांच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत**

**(८) २००३१ (०३-१२-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ, कल्याण, डोंबिवली, बदलापूर (जि. ठाणे) येथील एमआयडीसीमधून सोडण्यात येणाऱ्या केमिकल्समुळे उल्हास व वालधुनी या दोन्ही नद्यांचे पाणी प्रदूषित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केमिकल्समुळे या नद्यांचे पाणी तांबूस पिवळसर झाले असून त्यामुळे त्यांचा वापर करणाऱ्या नागरिकांना पोटाचे विकार होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हरित लवादाने या क्षेत्रातील पालिकांना दंड आकारणी केली असली तरी सदर एमआयडीसीमधील कंपन्यांवर कारवाई करण्यास संबंधित विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व निरी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये सदर औद्यागिक वसाहत प्रदूषणास जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले असून या अहवालातील शिफारशींबाबत कार्यवाही होत नसल्याने सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व निरी यांच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने दोन्ही नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) उल्हास व वालधुनी नदीच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हील अपिल क्र. १०५८२/२०१७ (उल्हासनगर महानगरपालिका वि. वनशक्ती पब्लिक ट्रस्ट) मध्ये मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशास अनुसरुन केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळ व निरी यांनी उल्हास व वालधुनी नदीचे सर्वेक्षण करुन त्याबाबतचा अहवाल व शिफारशी मा. न्यायालयामध्ये दिनांक ०५/१०/२०२० रोजी सादर केल्या होत्या. त्यानूसार, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत मा. मुख्य सचिव यांचे शपथपत्र दिनांक २३/११/२०२० रोजी मा. न्यायालयात सादर करण्यात आले आहे. तसेच मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशास अनुसरुन मा. प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितांच्या आढावा बैठका आयोजित करण्यात येत आहेत.

• वालधुनी व उल्हास नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अंबरनाथ, बदलापूर मधील उद्योगांचे सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतूदींनूसार १२१ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश, ९७ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस व १८ उद्योगांना प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले आहेत. तसेच अवैधरित्या सांडपाण्याची वाहतूक व विल्हेवाट लावणाऱ्या टँकरविरुध्द व संबंधित उद्योगांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत एफ.आय.आर. दाखल करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी येथे समुद्रशास्त्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(९) २०३२१ (०१-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्र किनाऱ्यालगत वास्तव्यास असलेल्या नागरिकांना रोजगार व्यवसायाचे शास्त्रीय ज्ञानाचे शिक्षण मिळवून देणे व समुद्र शास्त्र विषयावर उच्च दर्जाचे शिक्षण आणि संशोधन करण्यासाठी रत्नागिरी येथे समुद्रशास्त्र विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने समिती गठित केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीस आपला अहवाल सादर करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२४-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

कोकणाच्या विकासासाठी रत्नागिरी येथे Maharashtra Ocean Applied Sciences University (MOASU) स्थापन करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.४६/विशि-४, दिनांक ४ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) समिती तीन महिन्यात शासनास अहवाल सादर करणार आहे.

(४) समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड शहरात चालक अनुज्ञप्तीच्या चाचणीकरिता वाहन चालकांची होत असलेली गैरसोय

**(१०) २०३४३ (०७-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहरात वाहन परवान्यासाठी चाचणीचा ट्रॅक मोशी येथे अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नवीन आदेशानुसार वाहन परवाना मोटारीची (खाजगी आणि परिवहन) चाचणी नाशिक फाटा येथील आयडीटीआर मध्ये होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोशी येथील ट्रॅफिक पार्क मध्ये दुचाकी व मोटारीची चाचणी होत असताना त्यातून मोटारीची चाचणी वगळण्यात आली असून चालकांना नाशिक येथील आयडीटीआर येथे पाठविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चालकांकडून शासकीय शुल्काव्यतिरिक्त चाचणीसाठी अतिरिक्त शंभर रुपयांचे शुल्क आकारले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (२९-०९-२०२१) : (**१) हे खरे नाही
(२) व (३) पक्क्या अनुज्ञप्तीकरीता सादर होणाऱ्या केवळ चारचाकी (खाजगी आणि परिवहन) व जडवाहन या संवर्गाच्या पक्क्या अनुज्ञजीतीच्या चाचण्या आय.डी.टी.आर. भोसरी, पुणे येथे दि.१६.१०.२०२० पासून घेण्यात येत आहेत.
(४) केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ३२ मध्ये निर्धारीत केलेल्या चाचणी शुल्काव्यतिरिक्त सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, भोसरी पुणे येथील चाचणीपथावर वाहन चालक अनुज्ञजीतीच्या चाचणीसाठी येणाऱ्या उमेदवाराकडून चाचणीपथाचे शुल्क म्हणून वाजवी रक्कम रु.१००/- आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळामार्फत ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट कार्ड वितरणास विलंब होत असल्याबाबत**

**(११) २०३७८ (०७-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक अधिस्वीकृती धारक, पत्रकार, शालेय विद्यार्थी, सिकल सेल रुग्णांसह इतर २९ सवलती प्रवासात दिल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार व विद्यार्थ्यांसाठी महामंडळाकडून ५० रु. शुल्क आकारण्यात येत असून ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट कार्ड बनविण्यासाठी अंतिम मुदत दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी वा त्यादरम्यान पर्यंत दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक ज्येष्ठ नागरिकांनी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी शुल्क भरले असूनही अद्याप स्मार्ट कार्ड न मिळाल्याने त्यांना वारंवार राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी वा त्या पूर्वी स्मार्ट कार्ड वितरण करण्याची जबाबदारी असलेल्या पुरवठादार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (२४-०९-२०२१) :** (१) दि.०९.१०.२०१८ च्या शासन निर्णयानुसार एकूण २७ सवलती दिल्या जातात.
(२) हे खरे आहे.
(३) दि.२४.०६.२०२१ पर्यंत ३३,६५,१३३ एवढ्या ज्येष्ठ नागरिकांच्या स्मार्टकार्डचे नोंदणीकरण झाले असून, २९,८६,८८८ एवढ्या ज्येष्ठ नागरिकांना स्मार्टकार्ड वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित ३,७६,२४५ स्मार्टकार्ड वितरणाची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत ज्येष्ठ नागरिकांना स्मार्टकार्ड प्राप्त करुन घेण्यासाठी दि.३०.०९.२०२१ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शालेय विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक संगणक प्रणालीमध्ये जोडण्याबाबत

**(१२) २०३७९ (०७-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी व अद्ययावतीकरण दिनांक ३१ मार्च २०२१ रोजीपर्यंत पूर्ण करावे, अशा सूचना राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील १,१०,३१५ शाळांमधील ६४,५९,३८८ विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक सरळ संकेतस्थळ प्रणालीवर नोंदविणे प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय पोषण आहार योजना, राजीव गांधी अपघात सामुग्र अनुदान योजना, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक योजना या योजनांचा पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्याकरिता तसेच संबंधित लाभार्थ्यांना लाभाचे दुबार प्रदान रोखण्यासाठी आधार क्रमांक शिक्षण विभागाच्या सरळ प्रणालीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, काही विद्यार्थ्यांची दुबार नोंदणी एक आधार आणि दोन नावांचे वेगवेगळे विद्यार्थी दाखवून तसेच अस्तित्वात नसलेले आधार क्रमांक नोंदवून ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या संगनमताने लाभार्थ्यांची संख्या वाढवून अनुदान घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शालेय विभागाच्या विविध योजनांतील बोगस लाभार्थी संख्येद्वारे अनुदान घेणाऱ्या प्रवृत्तीस प्रतिबंध घालण्याकरिता इयत्ता १ ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांची हाताच्या अंगठ्याचा ठसा आधार नोंदणी मध्ये बायोमेट्रिक करून दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०९-२०२१) : (**१), (२) हे खरे आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.
(५) आधार नोंदणी व बायोमॅट्रीकचे अद्यावतीकरणाची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) आगारातील बसच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याबाबत**

**(१३) २७११० (२०-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) आगाराकडे पुरेशा प्रमाणात बस उपलब्ध नसल्यामुळे बहुतांश गावात बसच्या फेऱ्या होत नसल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोपरगाव आगारात बसची संख्या कमी असल्यामुळे गावातीत बसच्या कमी फेऱ्या होतात यासाठी या आगारातील बसच्या संख्येत वाढ करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (२४-०९-२०२१) : (**१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या कोपरगांव या आगारामध्ये चालनासाठी ६६ बसेस उपलब्ध असून, दैनंदिन ५७ नियतांद्वारे २३० फेऱ्या चालविल्या जातात. प्रवासी व विद्यार्थी यांच्या मागणीनुसार प्रवासी प्रतीसाद पाहून फेऱ्या चालविण्यात येत असून, चालनासाठी पुरेशा बसेस कोपरगांव आगारात उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुक्यातील काकडी विमानतळ व**
**शिर्डी विमानतळासंदर्भातील विविध मागण्यांबाबत**

**(१४) २७११४ (२२-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुक्यातील काकडी विमानतळाचा विस्तार वाढत असतांना विमान प्राधिकरणाला अतिरिक्त जमिनीची गरज भासणार आहे, विस्तारीकरणासाठी जमीन खरेदी करतांना काकडी विमानतळाच्या लागत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी कराव्यात, अशी मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काकडी विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे याबाबत प्रवाशांकडून तक्रारी येत असल्याने विमान प्राधिकरणाने प्रसाधनगृह, प्रतीक्षालय, स्तनपानगृह आदी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच स्क्रीनिंग मशीनची संख्या कमी असल्यामुळे या ठिकाणी स्क्रिनिंग मशीन वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, काकडी विमानतळावर धावपट्टीवर पावसाळ्यात मोठ्याप्रमाणात पाणी साचत असल्याने हे साचणारे पाणी पाईप लाईनच्या माध्यमातून तलाव खोदकाम करून पाझर तलावात सोडण्याबाबत तसेच काकडी विमानतळ ते शिर्डी मार्गावर दुतर्फा पथदिवे नसल्यामुळे प्रवाशांना अडचणी येत असल्यामुळे काकडी विमानतळ ते शिर्डी मार्गावर दुतर्फा पथदिवे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, काकडी विमानतळाच्या विविध सेवेत नोकरभरती करताना प्रामुख्याने प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्रांचा विचार करून स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्यात यावे, काकडी विमानतळाच्या अंतर्गत होणारी प्रवासी वाहतूक स्थानिक टॅक्सी चालकांमार्फत करावे, विमानतळावर करण्यात येणाऱ्या कामांचे कॉन्ट्रॅक्ट हे स्थानिक ग्रामस्थ व छोटे कॉन्ट्रॅक्टर यांना देण्यात यावे तसेच काकडी येथील शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(५) तसेच भारतीय विमान विकास प्राधिकरणाने शिर्डी (जि.अहमदनगर) विमानतळाला देशातील इतर विमानतळाप्रमाणे कार्गो विमानसेवा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली असतांनाही अद्यापपर्यंत या विमानतळावरून कार्गो सेवा सुरू झालेली नसल्याने शिर्डी विमानतळावरून कार्गो सेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. उद्धव ठाकरे (२२-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) अशी कोणतीही तक्रार प्रवाशांकडून प्राप्त झाली नाही. तथापि, विमानतळावर अतिरिक्त सुविधा पुरविण्याकरिता योग्य ती कार्यवाही केली जात आहे.

(३) शिर्डी विमानतळ धावपट्टीवर पावसाळ्यात पाणी साचत नाही. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारित येणाऱ्या मार्गावर दुतर्फा पथदिवे बसविण्यात आले आहेत.

(४) काकडी विमानतळाच्या विविध सेवेत नोकरभरती करताना प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्रांना प्राधान्य देण्यात येते. शिर्डी विमानतळावर टॅक्सी काऊंटर चालविण्याकरिता कार्यवाही केली असून स्थानिक ग्रामस्थ व छोटे कॉन्ट्रॅक्टर यांना निविदेद्वारे काम देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) नागरी विमानचालन ब्युरो यांच्याकडून प्रवासी विमानातून कार्गो वाहतूक करण्यास महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शिर्डी विमानतळावर नवीन कार्गो इमारत उभी करण्याच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंधारण योजनेतंर्गत नाला खोलीकरणासह गाळ काढण्याच्या कामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१५) २७१२६ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात मजुरांकडे काम नसल्यामुळे मजुर बेरोजगार झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जलसंधारण, नाला खोलीकरण व गाळ काढण्याच्या कामांची निर्मिती करून मजुरांना काम मिळण्याकरिता जलसंधारण, नाला खोलीकरण व गाळ काढण्याच्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०२०-२१ या वर्षात राज्यात नैसर्गिक संसाधनाच्या विकासाची (NRM) एकूण ३,१०,९१८ कामे सुरु करण्यात आली असून त्यापैकी २,५०,०९४ कामे चालू असून ६०,८२४ कामे पूर्ण केली आहेत. सदर कामांवर रु.१२६८१२.१८ लक्ष रुपये इतका खर्च झालेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) शहरातील पाच नंबर साठवण तलावाच्या कामासाठी व अस्तरीकरणासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१६) २७१३७ (२०-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) शहराची पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाच नंबर साठवण तलावाचे प्राथमिक स्वरूपातील खोदकाम गायत्री कंपनीच्या मदतीने पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साठवण तलावाचे पुढील काम व अस्तरीकरणासाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) (२) व (३) कोपरगाव (जि. अहमदनगर) शहरातील पाच नंबर साठवण तलावाचे प्राथमिक स्वरूपातील खोदकाम मे. गायत्री कन्स्ट्रक्शन यांच्यामार्फत करण्यात आलेले आहे.
• कोपरगाव नगरपरिषदेमार्फत साठवण तलावाचे काम, वितरणव्यवस्था बळकटीकरण करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सद्यस्थितीस मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
• सदर प्रकल्पास तांत्रिक मान्यतेअंती नगर परिषद प्रशासन संचालनालय मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार शासनस्तरावर विचारात घेण्यात येईल.

---

**धारणगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील पाणीपुरवठा योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(१७) २७१५६ (२०-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणगाव (ता.कोपरगांव, जि.अहमदनगर) पाणीपुरवठा योजना प्रलंबित असून या पाणीपुरवठा योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०९-२०२१) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेचा रु.६७७.४९ लक्ष ढोबळ किंमतीचा पुर्नसुधारित योजनेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. शासनाने दिनांक ४/९/२०२० रोजी जलजीवन मिशनबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून सदरची योजना आहे त्या स्थितीत अंतिम (Fore-closer) करुन जलजीवन मिशन कार्यक्रमातंर्गत रेट्रोफींटींग अंतर्गत अस्तित्वातील उपांगाचा वापर करुन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहरामध्ये एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत नोंद असलेल्या एका बालकाचा मृत्यू झाल्याबाबत.**

**(१८) २७१६० (२४-०३-२०२१). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरामध्ये एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत शहरातील गरोदर महिला तसेच माता व बालकांच्या सुदृढ आरोग्याकरिता त्यांची नोंद ठेवणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरामध्ये एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत नोंद असलेल्या एका बालकाचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बालकाच्या मृत्यूचे कारण काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यास जबाबदार असणाऱ्या संबधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकात्मिक बाल विकास सेवा

योजना अंतर्गत दोन प्रकल्प असून दोन्ही प्रकल्पामध्ये सन २०२१ मध्ये एकुण सात बालमृत्यू झालेले आहेत. त्या अनुषंगाने भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग बालमृत्यूसंबंधी आढावा समिती व प्रकल्प कार्यालय यांनी पडताळणी केली असता सदर बालमृत्यू हे कुपोषणाने झाले नसून इतर आजाराने झाले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी नियंत्रण शिधावाटप क्षेत्रातील "फ" परिमंडळ येथील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत वाहतूक करण्यात आलेल्या तांदुळाची देयके अदा करण्याबाबत**

**(१९) २७१६१ (२०-०३-२०२१). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी नियंत्रण शिधावाटप क्षेत्रातील 'फ' परिमंडळ येथील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सन २००२ ते २०१० सालापर्यंत १५ संस्थांमार्फत FCI गोदामांमधून शिधावाटप दुकानांपर्यंत तांदुळाची वाहतूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००२ च्या जुन महिन्याच्या वाहतुकीचे देयक वगळता उर्वरित देयके संचालक, अन्न व नागरी पुरवठा यांच्या स्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित देयकांची पुतर्ता करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (२४-०९-२०२१) : (**१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासन परिपत्रक दि. ०७.०३.२०११ व दि. २६.०३.२०१४ नुसार प्रलंबित देयके शासनास सादर करण्याबाबत स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत. तांदुळ साठ्याच्या अनुषंगाने मार्जिन / कमिशन आणि वाहतूक रिबेटची सन २००२-०३, ०४-०५, ०५-०६, ०६-०७ आणि ०७-०८ या पाच वर्षांची देयके फ परिमंडळ कार्यालयाकडून नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांना सादर करण्यात आली होती, तथापि देयकांमध्ये आकडेवारी परिगणणीय चुकांसह इतर त्रुटी आढळून आल्याने नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुंबई कार्यालयाने सदर देयके फ परिमंडळ कार्यालयास परत केली. त्यापैकी सन २००२-०३ चे मार्जिन / कमिशन आणि वाहतूक रिबेटचे देयक दुरुस्त्यांसह शासनास सादर करण्यात आले आहे.

---

**मुंबईतील कोरोना मृत्यू संख्येचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपायोजनांबाबत**

**(२०) २७२६० (१२-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेमध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी २० टक्के मृत्यू मुंबईत झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत घेण्यात येणाऱ्या प्रतिदिन चाचण्यांची संख्या ४०,००० पर्यंत कमी होणे, त्यामधील आर.टी.पी.सी.आर. चाचण्यांचे प्रमाण कमी असणे, मृत्यूंच्या जुन्या नोंदी अद्याप अद्ययावत झालेल्या नसणे ही कारणे प्रामुख्याने मुंबईतील मृत्यूंच्या संख्येमध्ये वाढ होण्यामागे आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे कोरोना लढ्यासाठी तसेच येणाऱ्या तिसऱ्या लाटेला रोखण्याच्या तयारीसाठी नेमकी माहिती उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील दैनंदिन चाचण्यांच्या संख्येत, त्यातही आर.टी.पी.सी.आर. या चाचण्यांच्या संख्येत वाढ करण्याच्या दृष्टीने तसेच मृत्यूच्या जुन्या नोंदी लवकरात लवकर अद्ययावत करुन कोरोना मृत्यू संख्येचे प्रमाण कमी करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०८-२०२१) :** (१) कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेमध्ये राज्याच्या तुलनेत दिनांक ३१ मे, २०२१ पर्यंत मुंबईत १०.५% मृत्यू मुंबईत झाले आहेत.

तथापि मुंबईची रुग्णसंख्या जास्त असल्यामुळे तसेच सर्वोत्तम उपचाराची सोय उपलब्ध असल्यामुळे मुंबईबाहेरील क्षेत्रातील रुग्ण देखील उपचारासाठी मुंबईत दाखल होत असल्यामुळे रुग्ण संख्येच्या मानाने मृत्यू संख्या अत्यल्प असून मुंबईचा मृत्यू दर माहे एप्रिलमध्ये ०.८६% इतका होता असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) मुंबईतील दैनंदिन चाचण्यांच्या संख्येत, त्यातही आर.टी.पी.सी.आर. या चाचण्यांच्या संख्येत वाढ करण्याच्या दृष्टीने तसेच मृत्यूच्या जुन्या नोंदी लवकरात लवकर अद्ययावत करुन कोरोना मृत्यू संख्येचे प्रमाण कमी करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• अखिल भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान संस्थेने दिलेल्या व वेळोवेळी अद्ययावत केलेल्या निकषानुसार मुंबईत कोविडसंबंधी चाचण्या पार पाडल्या जातात.

• या निकषानुसार कोविडची लक्षणे असलेले संशयित रुग्ण, कोरोनाबाधीत रुग्णांचे अतिजोखमीचे सहवासीत, ज्यांची ऑक्सिजन पातळी कमी आहे असे वृध्द, दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्ती या सर्वांच्या चाचण्या केल्या जातात.

• याच निकषानुसार एप्रिल महिन्यात चाचण्यांमधील आर.टी.पी.सी.आर. चाचण्यांचे प्रमाण हे ६७.८% इतके होते.

• तसेच सर्व रुग्णालयांना कोविड मृत्यूंची माहिती मृत्यू घडल्याच्या ४८ तासांच्या आत महानगरपालिकेस कळविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

• सदर माहिती निर्धारित वेळेच्या आत प्राप्त होणेबाबत खातरजमा केली जाते.

• सर्व कोविड मृत्यूची नोंद एनएचपी पोर्टवर वेळेवर करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात विना परवाना ड्रायव्हिंग स्कूल सुरु करण्यात आल्याबाबत**

**(२१) २७३०२ (११-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात अनेक भागामध्ये परिवहन कार्यालयाच्या परवानगी शिवाय ड्रायव्हिंग स्कूल सुरु असून यामध्ये शिकाऊ चालकांना वाहन परवाना मिळवून दिला जात असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन आयुक्तालयाकडून सारथी प्रणालीवर नमुना क्र.५ हा अर्ज न भरता तसेच अधिकचे शुल्क आकारून वाहन परवाने दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन विभागाशी संबंधित दलाल, अधिकारी/कर्मचारी व ड्रायव्हिंग स्कूल यांच्या संगनमताने सदर प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (२३-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) मोटार ड्रायव्हींग स्कुल यांना सारथी ४.० प्रणालीवरुन लॉगीन आय.डी. देणेबाबत व फक्त सारथी ४.० प्रणालीवरील नमूना-५ व नमूना ५अ ऑनलाईनच स्विकारण्याबाबतच्या सूचना परिवहन उप आयुक्त (संगणक) यांच्या दि.११.१२.२०१९ व दि.०३.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांना देण्यात आल्या असून त्याप्रमाणे कामकाज करण्यात येत आहे.तसेच नमुना क्र.५ न भरता अधिकचे शुल्क आकारुन वाहन परवाना दिला जात नाही. संपूर्ण प्रक्रीया संगणकीय असून यामध्ये मानवी हस्तक्षेप नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गोरेगाव (पुर्व) येथील आरे वसाहतीतील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२२) २७३७७ (१२-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव (पुर्व) येथील आरे वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती होत नसल्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडणे, काही भागात खडी टाकून रस्त्यांची दुरुस्ती केल्याचे सांगणे तसेच रस्त्यावर खड्यांचे प्रमाण अधिक असल्याने पावसाळ्यात सदर रस्त्यांची दूरवस्था झाल्याने स्थानिक रहिवाशी, शासकीय कर्मचारी आणि इतरांना प्रचंड गैरसोयीचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वसाहतीतील अतंर्गत असलेल्या सर्व रस्त्यांची जबाबदारी मुंबई महापालिकेकडे सोपविण्यात यावी याकरिता गोरेगाव प्रवासी संघाने मा.मुख्यमंत्री, आयुक्त, मुंबई महापालिका, महापौर यांना दिनांक १४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी केलेल्या तक्रारीकडे अनेक वेळा दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या प्रश्नाबाबत दिलेल्या उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (२०-०९-२०२१) :**(१)आरे वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांवर खड्डयांचे प्रमाण अधिक आहे हे खरे आहे.
(२) अशा प्रकारचे लेखी निवेदन मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालयास तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.
(३) सदर निवेदनाची प्रत शासनास प्राप्त झालेली नाही. तथापि, विभागाकडे उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून दुरुस्ती करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने केलेला गैरव्यवहार**

**(२३) २७३८० (१५-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने राज्यातील सुमारे ४० हजार बांधकाम कामगारांना घरगुती ३० वस्तुंचा संच पुरवठा करण्यासाठी, राज्याच्या वित्त विभागाची व मंत्रिमंडळाची परवानगी न घेता, मडंळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी इंडो अलाइड, पारस फुडस आणि गुनिना या तीन मर्जीतील ठेकेदार कंपन्यांना सुमारे एक हजार कोटी रुपयाचे कंत्राट बेकायदेशीररित्या दिल्याप्रकरणी केंद्रीय बांधकाम आणि इतर बांधकाम कामगार सल्लागार मंडळाचे अध्यक्षांनी सदरहू निविदा रद्द करुन या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मा.कामगार मंत्री यांचेकडे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वस्तू खरेदीसाठी तयार करण्यात येणारी निविदा उक्त ठराविक तीन कंपन्याना मिळाव्यात या पध्दतीने तयार करण्यात येऊन गेली सात वर्षापासून सर्व कामांची निविदा देण्यात येत असल्याने काही निविदाधारकांनी सदर एक हजारो कोटींच्या विविध वस्तूंच्या खरेदीच्या निविदेसंदर्भात मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व केंद्रीय बांधकाम आणि इतर बांधकाम कामगार सल्लागार मंडळांकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे काय काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र बांधकाम कामगार मंडळाकडे आतापर्यंत जमा झालेला लेबर सेस व त्याचे लेखापरिक्षण अद्याप पर्यंत करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कामगारांचा लेबर सेस निधी, बेकायदा निविदा प्रक्रिया व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या गैरकारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे अनुषंगाने सदरहू कामाची निविदा रद्द करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (२४-०९-२०२१) :** (१) केंद्रीय बांधकाम कामगार व इतर बांधकाम कामगार सल्लागार मंडळाच्या अध्यक्षांनी दि. २४.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये निविदा रद्द करण्याबद्दल कळविले आहे, हे खरे आहे,

तथापि, राज्यातील १० लाख बांधकाम कामगार लाभार्थ्यांना गृह उपयोगी वस्तू संच वितरण करण्यासाठी दि. ०१ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे संस्था निवडीची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) गृहोपयोगी वस्तू संच वितरण या निविदा प्रक्रियेबाबत काही निविदाकारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

तथापि, गृहोपयोगी वस्तू संच वितरीत करण्यासाठी संस्था निवडीकरिता प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेमध्ये सदरहू मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वस्तू खरेदीसाठी तयार करण्यात येणारी निविदा दि. १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे प्रसिध्द केली आहे.

(३) हे खरे नाही. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा झालेला उपकर व त्यामधून कल्याणकारी योजना व व्यवस्थापनावर झालेल्या खर्चाचे सन २००७-०८ ते सन २०१८-१९ पर्यंतचे लेखापरिक्षण करण्यात आले असून विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ऑनलाइन व्हिडीओ कॉल करुन अश्लील चित्रफिती तयार करण्यात येत असल्याबाबत**

**(२४) २७३९५ (०९-०६-२०२१). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाइन व्हिडीओ कॉल करुन त्यांच्या अश्लील चित्रफिती रेकॉर्ड करुन व्यक्तीला पाठविण्यात येत असून त्यांना ब्लॅकमेल करण्यात येवून त्यांच्याकडे पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०९-२०२१) :** (१) होय.

(२) होय. या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती राज्यात ऑनलाईन व्हिडीयो कॉल करुन त्यांच्या अश्लील चित्रफिती तयार करण्यात येत असल्याची प्रकरणे अढळून आली आहेत. सदर प्रकरणातील मुंबईसह राज्यात एकूण ३४ गुन्हे दाखल झाले असल्याची नोंद आहे.

(३) मुंबईसह राज्यात दाखल झालेल्या एकूण ३४ गुन्ह्यांमध्ये एकुण १५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील महिला व बालविकास सेवा योजनेंतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका आणि अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२५) २७४६६ (१५-०६-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाची लागण लहान मुलांमध्ये होण्याचे प्रमाण वाढत असताना महिला व बालविकास सेवा योजनेंतर्गत लहान मुलांसाठी काम करणाऱ्या बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मंजूर ६२० पदांपैकी २८७ पदे, मुख्यसेविकांच्या मंजूर ३,९०० पदांपैकी १,०१९ पदे आणि अंगणवाडी सेविकांची सुमारे हजारो पदे रिक्त असल्याची बाब माहे दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या तिसऱ्या लाटेमध्ये लहान मुलांमध्ये संसर्गाचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याचे वैद्यकीय तज्ञांनी निदर्शनास आणले आहे तसेच ज्यातील महिला व बालविकास सेवा योजनेंतर्गतील बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका आणि अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१३-०८-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील नागरी प्रकल्पातील मुख्यसेविकांची रिक्त पदे आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांच्यामार्फत तर ग्रामीण प्रकल्पातील पर्यवेक्षिकांची रिक्त पदे ग्राम विकास विभागाकडून भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासन पत्र दि.१२.५.२०२१ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील इंडस्ट्रीयल ईस्टर्स ॲण्ड केमिकल प्रा.लिमिटेड या कंपनीत कामगारांचा झालेला मृत्यू**

**(२६) २७४७६ (१५-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील वडोल एमआयडीसीतील इंडस्ट्रीयल ईस्टर्स अँड केमिकल प्रा. लिमिटेड या कंपनीत दिनांक २८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास भूमिगत रासायनिक टाक्या साफ करुन त्याला रंगकाम करण्यासाठी उतरलेल्या तीन कामगारांचा गुदमरुन मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रासायनिक टाक्या साफ करण्यासाठी टाक्यांचे प्रथम वायु निष्कासन न करता, कामगारांना कोणतेही पीपीई किट व ऑक्सीजन वायू पुरवठा करणारे सिलेंडर न देताच कंपनी

प्रशासनाने जबरदस्तीने कामगारांना टाक्यात उतरवल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने मृत कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात तसेच कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (२३-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मे. इंडस्ट्रीयल इस्टर्स ॲन्ड केमिकल्स् प्रा.लि., वडोल गाव एमआयडीसी, अंबरनाथ, जि.ठाणे येथील या कारखान्यात दि. २७.०३.२०२१ रोजी भुमिगत फर्नेस ऑईल साठविण्याची टाकी साफ करण्यासाठी टाकीत उतरलेल्या तीन कामगारांचा गुदमरुन मृत्यु झाला आहे.

(२) सदर कारखान्यांच्या आवारातील बंदिस्त भुमिगत फर्नेस ऑईल साठविण्याची टाकी साफ करण्यापूर्वी टाकीमध्ये धोकादायक वायु नसल्याची तपासणी सक्षम व्यक्तीकडून करण्यात आलेली नव्हती. तसेच सदर टाकीमध्ये काम करण्यासाठी कामगारांना सेफ्टी बेल्ट व ऑक्सिजन वायु पुरवठा करणारे सिलेंडर अशी सुरक्षा उपकरणे पुरविण्यात आलेली नव्हती.

(३) व (४) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रु.३.५० लक्ष इतके सानुग्रह अनुदान दिलेले आहे. तसेच आयुक्त, कामगार नुकसान भरपाई, ठाणे यांनी मृत कामगारांच्या वारसास कामगार नुकसान भरपाई अधिनियम, २००५ अन्वये कारखान्याच्या भोगवटादाराला नुकसान भरपाई देणेबाबत नोटीस बजावली आहे.

सदर घटनेबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या नियम भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे. तसेच पोलीस विभागामार्फत सदर घटनेची चौकशी करुन कारखान्याचे भोगवटादार व इतर यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयात परिवहन मंडळाकडे एसटीचे टायर उपलब्ध नसल्याबाबत

**(२७) २७५१९ (१८-०६-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात टायर शिल्लक नसल्याने मागील दोन महिन्यापासून परिवहन मंडळाच्या टायर नादुरुस्त असलेल्या सुमारे २०० बसेस जागेवरच उभ्या असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाकडे एमआरएफचा असलेला कोटा संपल्याने व जे.के कंपनीची कोटयावधीची थकबाकी असल्याने कंपनीने महामंडळाला टायरचे वितरण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने टायरचे वितरण करुन महामंडळाच्या बसेस पूर्ववत सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (२४-०९-२०२१) :** (१), (२) व (३) कोरोना आजारामुळे माहे मार्च ते जून, २०२१ या कालावधीत टप्याटप्याने लॉकडाऊन केला असल्याने महामंडळाची वाहतूक अंशत:च सुरु होती. त्यामुळे काही बसेस जागेवर उभ्या होत्या. या कालावधीत महामंडळाच्या उत्पन्नात घट झाल्याने व संबंधित टायर पुरवठादार कंपनीच्या बिलांच्या अदायगीस विलंब झाल्याने, टायर्स पुरवठा वेळेवर प्राप्त होण्यास विलंब झालेला होता. कंपनीच्या बिलांची अदायगीकरण केल्याने उपरोक्त कालावधीत टायर्सचा पुरवठा सुरळीत झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तांबवे (ता.कराड, जि.सातारा) येथे कोयना नदीच्या पुलाखाली तीन जिवंत हातबॉम्ब सापडल्याबाबत

**(२८) २७५५५ (१७-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु. पो. तांबवे (ता.कराड, जि.सातारा) येथे कोयना नदीच्या पुलाखाली मासेमारी करणाऱ्या युवकांना तीन जिवंत हातबॉम्ब (हॅंडग्रेनेड) माहे मे, २०२१ रोजी मध्ये वा त्यादरम्यान च्या तीसऱ्या आढवड्यास सापडले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच राज्याला पाणी व विज देणाऱ्या कोयना धरणाच्या सुरक्षात्मक उपाययोजनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी कराड तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २४०/२०२१, भा.दं.वि. कलम २८६ सह बारी पदार्थ अधिनियम कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा तपासावर आहे.
(३) कोयना धरण सुरक्षेसाठी १ सहाय्यक पोलीस निरीक्षक व एकूण ५२ सशस्त्र पोलीस अंमलदार गार्ड ड्युटीवर नेमण्यात आलेले आहेत. सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक, सुरक्षा शाखा यांनी कोयना धरणास भेट देवून नेमण्यात आलेल्या सुरक्षा गार्डची तपासणी करुन त्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सन २०२१ मध्ये पोलीस निरीक्षक, पाटण यांनी ३ वेळा, सहाय्यक पोलीस निरीक्षक कोयनानगर यांनी ६४ वेळा, बॉम्ब शोधक व नाशक पथक सातारा यांनी ५ वेळा पोलीस निरीक्षक, सुरक्षा शाखा, सातारा यांनी १ वेळा, पोलीस निरीक्षक, फलटण यांनी १ वेळा कोयना धरण सुरक्षा व्यवस्था तपासणीकामी भेट दिलेली आहे.

उपरोक्त नमूद भेटीच्या वेळी भेट देणारे पोलीस अधिकारी हे कोयनाधरण सुरक्षा व्यवस्थेसाठी नेमलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना संभाव्य अतिरेकी कारवाया व त्यानुसार घ्यावयाची दक्षता/ खबरदारी याबाबत सक्त सूचना देतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तामसवाडी (ता.निफाड, जि.नाशिक) येथे गोदावरी नदीपात्रात दुषित पाण्यामुळे हजारो माशांचा झालेला मृत्यू**

**(२९) २८०२९ (११-०६-२०२१). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीत नाशिक महानगरपालिका व औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषित पाणी सोडल्यामुळे नदीचे पाणी दुषित होऊन मौजे तामसवाडी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गोदावरी नदीपात्रातील हजारो माशांचा मृत्यू झाला असल्याने यावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गोदावरी नदीपात्रात अनेक गावांच्या नळ पाणीपुरवठा योजना व शेतीस पाणी पुरवठा करणाऱ्या योजना गोदावरी नदीवर कार्यान्वित असून माशांचा मृत्यू झाल्याने नदीच्या काठावर दुर्गंधी पसरुन नदीपात्रात केमिकलयुक्त पाण्याचा तरंग आल्याने परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यामध्ये दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार नदीपात्रातील दूषित पाण्यामुळे पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीच्या पाण्याला कोणताही प्रादुर्भाव झालेला नाही. तसेच नदी किनाऱ्यांवरील गावांमध्ये कोणत्याही आजारांची साथ अथवा रुग्ण वाढ झालेली नाही.

(३) उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ०८/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. विधानसभा सदस्यांना अवगत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गोदावरी नदीमध्ये पानवेली वाढल्याने पाणी दूषित होत असल्याबाबत**

**(३०) २८०३१ (१२-०६-२०२१). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदी नाशिक शहरातून वाहत असल्याने नाशिक महानगरपालिका व औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषित पाणी हे गोदावरी नदीपात्रात सोडले जात असल्याने गोदावरी नदीचे पाणी दुषित होत असून, याप्रकरणी उपाययोजना करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी

माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदोरी, सायखेडा, करंजगाव, शिंगवे सह इतरही गावांच्या परीसरातील गोदावरी नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पानवेली वाढलेल्या असल्याने नदीपात्रात दुषित पाणी साचून राहिल्याने नदीकाठच्या गावांना पाण्याच्या दुर्गंधीमुळे डेंगू, मलेरिया यासारख्या आजारांच्या प्रादुर्भावास सामोरे जावे लागत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी नदीपात्रातील वाढलेल्या पानवेली नष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने प्राप्त निवेदनानूसार सद्यस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना कळविण्यात आले आहे.

• नाशिक महानगरपालिकेमार्फत नाशिक महानरपालिका हद्दीत गोदावरी नदी पात्रात वाढलेल्या वाढलेल्या पाणवेली Trash Skimmer ने वेळोवेळी काढण्यात येतात.

• गोदावरी नदीमध्ये विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नाशिक महानगरपालिकेस दिनांक ३१/०८/२०२० रोजी कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नाशिक यांना दि. २२/०१/२०२१ रोजी जल कायदा, १९७४ अंतर्गत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा व पवनी (जि.भंडारा) या दोन तालुक्यांचा 'मानव विकास कार्यक्रम' या योजनेर्गत समावेश करण्याबाबत

**(३१) २८३१५ (१५-०६-२०२१). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : तारांकित प्रश्न क्रमांक २६६ ला दिनांक १३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील भंडारा व पवनी तालुक्यांचा मानव विकास कार्यक्रमांतर्गत योजनेत समाविष्ट नसल्याने शिक्षण, आरोग्य व रोजगार या घटकांतर्गत विविध योजनांतर्गतचे लाभार्थी तसेच धान पिक घेणारे व ५० टक्के पर्यंत आदिवासी दुर्बल घटकातील कुंटुंब सर्वांगिन विकास होण्यापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानव विकास कार्यक्रमांतर्गत भंडारा व पवनी या दोन तालुक्यांचा समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन विभाग यांना दिनांक १० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या मागणीच्या अनुषंगाने आदिवासी बहुल, धानाचे पिक घेणारे आर्थिक दुर्बल घटकांचा शैक्षणिक व आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत भंडारा व पवनी दोन तालुक्यांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१५-०७-२०२१) :** (१) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. मावििम-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८, दिनांक १९.७.२०११ यामध्ये मुद्दा क्र. ४ (ii) अन्वये मागासलेल्या तालुक्यांच्या निवडीसाठी सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे प्रमाण हे दोन निकष विचारात घेण्यात आले आहेत. या निकषांनुसार भंडारा जिल्ह्यातील "लाखांदूर, साकोली, लाखनी, मोहाडी व तुमसर" या ५ तालुक्यांचा सदर योजनेत समावेश करण्यात आलेला आहे व "भंडारा व पवनी" या दोन तालुक्यांचा "मानव विकास कार्यक्रम"अंतर्गत समावेश करण्यात आलेला नाही.
(२) होय.
स्थानिक लोकप्रतिनिधी महोदय यांनी या संदर्भात दि. १०.०३.२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन सादर केलेले आहे.
(३) व (४)" मानव विकास कार्यक्रम" अंतर्गत "भंडारा व पवनी" या दोन तालुक्यांची निवड करणे, ही धोरणात्मक बाब आहे. "भंडारा व पवनी" या दोन तालुक्यांसह राज्यातील उर्वरित २३१ तालुक्यांच्या बाबतीत उचित निर्णय घेण्याकरिता (i) आरोग्य, (ii) शिक्षण व (iii) उत्पन्नवाढ या ३ निर्देशांकासंदर्भातील Baseline Data संकलित करुन "यशदा, पुणे" कडून सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला आहे. यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभाग व तज्ञ संस्था जसे "युनिसेफ","टि. आय. एस. एस." यांच्याकडून अभिप्राय प्राप्त करुन "मानव विकास कार्यक्रम" अंतर्गत निकष पुन्हा निश्चित झाल्यावर उर्वरित २३१ तालुक्यांपैकी पात्र नवीन तालुके समाविष्ट करण्याबाबतचा उचित निर्णय घेण्यात येईल.

---

## राज्यातील अंगणवाड्यांमधील बालकांसाठी खरेदी करण्यात आलेले पूर्व शालेय शिक्षण संच (खेळणी संच) निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(३२) २८४०५ (१५-०६-२०२१). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांमधील बालकांसाठी पूर्व शालेय शिक्षण संच (खेळणी संच) आणि सरकारी आरोग्य संस्थांमध्ये बाळंतपण झालेल्या महिलांच्या बालकांसाठी देण्यात येणारे बेबी किट केअर निकृष्ट दर्जाचे खरेदी असल्याची बाब दिनांक १९ एप्रिल २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वस्तूंची खरेदी बाजारभावापेक्षा अंदाजे पाचपट अधिक खर्च करून करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषी असण्या-या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२५-०८-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील ग्रामपंचायत हद्दीतील पथदिव्यांची वीज जोडणी पूर्ववत करण्याबाबत**

**(३३) २८४१७ (१५-०६-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांवरील पथदिव्यांचे वीज देयक न भरल्यामुळे वीज जोडणी तोडल्याने रात्रीच्या वेळी रस्त्यावर पसरलेल्या अंधारात पर्यटकांसह स्थानिक नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पथदिव्यांचे रुपये १११ कोटी ५४ लाख ८५ हजार वीज देयक थकित असल्यामुळे वीज मंडळाकडून सदर वीज जोडणी तोडण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज मंडळाकडून पथदिव्यांच्या थकित देयकासंदर्भात संबंधीत ग्रामपंचायती व जिल्हा परिषदेकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही थकित विज देयक भरण्यासंदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्हयातील ग्रामपंचायत हद्दीतील पथदिव्यांची वीज जोडणी करण्याबाबत तसेच थकित वीज देयक भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (२२-०९-२०२१) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

तथापि, रायगड जिल्ह्यामधील सर्व तालूक्यात माहे एप्रिल, २०२१ पासून खंडीत केलेली पथदिव्यांची जोडणी पुर्ववत केलेली होती. परंतु सद्यस्थितीत अलिबाग, माणगाव, खालापूर, मुरुड, तळा, रोहा, सुधागड तालुक्यातील काही ग्रामपंचायतींची पथदिव्यांची जोडणी खंडीत केलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) रायगड जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतींना सन २०१८ नंतर बसविण्यात आलेल्या पथदिव्यांचे विद्युत देयकाची रक्कम भरणा केलेली आहे. पथदिव्यांची वीज देयके अदा करण्याबाबत जिल्हा परिषदस्तरावरुन गट विकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीच्या वयोमर्यादा वाढविण्याबाबत

**(३४) २८४४४ (१२-०६-२०२१). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीच्या वयोमर्यादा ५८ असून ही मर्यादा वाढविण्यासाठी राज्य सरकारी कर्मचारी मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन भरती प्रक्रियेने कर्मचारी उपलब्ध होण्यास किमान ३ ते ४ वर्षाचा कालावधी लागतो व जागा रिक्त असल्याच्या पार्श्वभूमीवर निवृत्तीचे वय वाढवून प्रशासकीय मनुष्यबळ टिकविण्यासाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२४-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवानिववृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबत शासनाचे धोरण सद्य:स्थितीत निश्चित करण्यात आलेले नाही.

---

## मौजे एरंगळ (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या भूखंडावर बेकायदेशीर व नियमबाह्यरित्या भराव टाकल्याबाबत

**(३५) २८८०७ (११-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे एरंगळ (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील सर्व्हे क्रमांक १२९ व १३० या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या भूखंडावर मे.रिध्दी सिध्दी रिअल व्हेंचर एल.एल.पी. या कंपनीकडून बेकायदेशीर व नियमबाह्यरित्या भराव टाकण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंडावर भराव टाकण्याकरिता मे.रिध्दी सिध्दी रिअल व्हेंचर एल.एल.पी. यांना सन २०१९ मध्ये परवानगी देताना जिल्हाधिकारी कार्यालय, वन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, पोलीस प्राधिकरण तसेच भरणीच्या अनुषंगाने आवश्यक इतर शासकीय विभागांच्या परवानग्या मिळविणे आवश्यक असून या परवानग्यांच्या प्रती मंडळाच्या कार्यालयास सादर करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने दिनांक २९ जुन, २०१९ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सदर कंपनीस जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तसेच स्थानिक पोलीस स्थानकाकडून अशी कोणतीच परवानगी मिळाली नसल्याचे या प्रकरणी माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असता निदर्शनास आल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदरहू प्रकरणी वन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र देताना या भूखंडावरील खारफुटींच्या, तिवरांच्या झाडांचा उल्लेख जाणीव पूर्वक टाळण्यात येवून या भूखंडावरील

कांदळवनाचा ऱ्हास करण्यास हेतु:पूर्वक व बेजबाबदारपणे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले व उक्त कंपनीला सन २०१९ मध्ये परवानगी देताना दिलेल्या अटी व शर्तीचे कंपनीने उल्लंघन केलेले असताना पर्यटन विकास महामंडळाच्या भूखंडावर भरणी करण्याकरिता माहे सप्टेंबर, २०२० मध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून मुदतवाढ देण्यात आली तसेच या भूखंडावर भराव टाकण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी १ वर्षाची परवानगी देताना नमूद केलेल्या अटी व शर्तीचेही उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करून या प्रकरणी मे.रिध्दी सिध्दी रिअल व्हेंचर एल.एल.पी. व या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर फौजदारी व दंडात्मक कारवाई करण्याबाबत लाईफ इन लाईट या सेवाभावी संस्थेने माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान मा.पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, कार्यकारी अभियंता (घनकचरा व्यवस्थापन ७) बृहन्मुंबई महानगरपालिका, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कार्यालय, पोलीस उपायुक्त (झोन ११), महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून मे.रिध्दी सिध्दी रिअल व्हेंचर एल.एल.पी. यांचेवर तसेच या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२३-०९-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर क्षेत्र हे अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रापासून ५० मी.पेक्षा जास्त अंतरावर असल्याने ना-हरकत देण्यास हरकत नाही, असे वन परिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांनी त्यांच्या दि.४.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा. विभागीय वन अधिकारी, मु.का.सं.घ. मुंबई यांना कळविले होते. तसेच सदर भागात मोठ्या प्रमाणात खारफुटी वनस्पती नष्ट होऊन पर्यावरणाचा ऱ्हास झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन) यांच्या दि.१३.०१.२०२१ रोजीच्या पत्रानुसार मौजे-एरंगळ, ता. बोरीवली सर्वे १२९ व १३० (न.भू.क्र. १ व ७२) मे.श्री. रिध्दी सिध्दी रिअल व्हेंचर एल.एल.पी. व मे. गजानन इन्फ्रा यांना उपरोक्त जागेवर ६३१२९५ ब्रास भरणीकरीता परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार दि. ०३.०२.२०२१ पर्यंत वाहन नोंद रजिस्टर तपासणी केली असता १३३६ ब्रास माती व मुरुम एवढी भरणी केल्याचे दिसून आले.

(५) होय, हे खरे आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सदर भरावाचे काम बंद आहे

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे परिचारिकेने १२ रेमडेसिवीर इंजेक्शनची चोरी केल्याबाबत**

**(३६) २८९८७ (१५-०६-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे परिचारीकेने १२ रेमडेसिवीर इंजेक्शनची चोरी केल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ रोजी वा त्यादरम्यान च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी परिचारीकेसह इंजेक्शन चोरी केलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१४-०९-२०२१) :** (१) प्राप्त अहवालानुसार हे खरे आहे.

(२) प्राप्त अहवालानुसार संबंधीत अधिपरिचारीका यांची जिल्हास्तरावर चौकशी करण्यात आलेली असून पोलीस स्टेशन बेलतरोडी, जि.नागपूर यांचेमार्फत गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) संबंधीत कंत्राटी परिचारीकेची सेवा समाप्त करण्यात आलेली असून सदर परिचारीकेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील १३ गावांतील नळपाणीपुरवठा योजनांबाबत**

**(३७) २९६८० (११-०६-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील १३ गावांतील नळपाणीपुरवठा योजना नादुरुस्ती आणि पाणीस्त्रोत कोरडे पडल्याने या गावात पाणी टंचाई निर्माण झाल्याची बाब माहे मे, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेलू तालुक्यातील ८२ ग्रामपंचायती असून ९२ गावे आहेत त्यात ८५ पाणीपुरवठा योजना असून ६९ पाणीपुरवठा योजना सुरू तर १३ गावांतील पाणीपुरवठा योजना बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यातील अनेक योजना देखभाल दुरुस्तीअभावी ठप्प असून म्हाळसापूर येथे कोणतीच स्वतंत्र योजना नाही व चिखलठाणा (खु.) आणि डिग्रस जहांगीर येथील जुन्या भारत निर्माण योजाना रद्द झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार सेलू तालुक्यातील १३ गावांना तात्काळ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०९-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

१३ गावांपैकी ३ गावांत टंचाई निर्माण झाल्याने तात्पुरत्या उपाययोजनांद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

मौ.म्हाळसापूर ता.सेलू येथे स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना अस्तित्वात नाही. तथापि, सदर गावाचा ८ गावे डासाळा प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनामध्ये समावेश आहे. सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेने व ग्राम पंचायतीने पाणीपट्टी जमा न केल्याने व पुन्हा विद्युत देयके न भरल्याने विद्युत जोडणी तोडण्यात आली. त्यामुळे जुलै, २०२० अखेर पासून योजनेद्वारे पाणी पुरवठा बंद झाला आहे.८ गाव डासाळा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, परभणी मार्फत केली आहे.

मौ.चिकलठाणा खु. आणि डिग्रस (जं.) ता.सेलू भारत निर्माण कार्यक्रमातंर्गत नळ पाणीपुरवठा योजनेस सन २००७-०८ मध्ये मंजूरी प्राप्त आहे. सदरील योजनेस अपहारामुळे पोलीसात गुन्हा नोंद होवून सद्य:स्थितीत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

अनेक वर्षे सदर मौ.चिकलठाणा खु. आणि डिग्रस (जं.) योजनेची कामे होऊ न शकल्यामुळे शासन स्तरावरुन रखडलेल्या योजना बाबत होणारा पाठपुरावा, सूचना व दरसूचीच्या फरकामुळे सदर योजनेची कामे पुढील कालावधीत होणे शक्य नसल्याने, आहे त्या स्थितीत झालेल्या कामाची नोंद IMIS प्रणालीत घेण्यात आली आहे.

तथापि ग्रामस्थ कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजनेपासून वंचित राहू नये म्हणून या गावाचा समावेश जल जीवन मिशन सन २०२१-२२ अंतर्गत करण्यात आलेला आहे. डिग्रस (जं.) ता.सेलू येथे म.ग्रा.रो.ह.यो.अंतर्गत सार्वजनिक पाणी पुरवठा विहिरीचे काम पूर्ण झाले असून विहिरीस पाणी आवक क्षमता कमी असल्याने भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा यांच्या शिफारशी वरुन उद्भव बळकटीकरणाची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

(४) सदर १३ योजनांचा जल जीवन मिशनमध्ये समावेश असून अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत सदर योजनांना अस्तित्वातील स्त्रोताद्वारे (हातपंप /विद्युतपंप) पाणी पुरवठा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम, अकोला यांनी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याबाबत दिलेल्या प्रस्तावाबाबत**

**(३८) ३०३४७ (१८-०६-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील मनपा हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील रस्ता दुरुस्तीचे काम करारनामा क्र. ब - १/ डीएल/२०१५-१६ नुसार करण्यासाठी कार्यकारी अभियंता सा.बां विभाग अकोला यांनी मे. सी.आर कंस्ट्रक्शन यांना दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ रोजी नुसार कार्यारंभ आदेश दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम दिनांक २५ मार्च, २०१६ रोजी पूर्ण करण्यात आले तथापि सदर कामाचा दोष दायित्व निवारण कालावधी दिनांक २४ मार्च, २०१८ पर्यंत होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोष दायित्व कालावधीत रस्ता दुरुस्तीसाठी कार्यकारी अभियंता सा.बां विभाग अकोला यांनी आदेश देऊन सुद्धा कंत्राटदाराकडून रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीअंती अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ अकोला यांनी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता सा.बां.अमरावती यांना सादर केला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०९-२०२१) : (**१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी शासन निर्णय क्र.संकिर्ण-०५/०६/प्र.क्र.५३/इमा-२, दि.२८ सप्टेंबर, २००६ नुसार कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या कार्यपद्धतीबाबत विषद मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरणगाव (ता.भुसावळ,जि.जळगाव) येथील एका व्यक्तीवर शस्त्रांनी वार करुन खून केल्याबाबत**

**(३९) ३११६३ (१७-०६-२०२१). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ,जि.जळगाव) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरातील महालक्ष्मी सॉमील जवळ दिनांक ७ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास एका व्यक्तीवर धारदार शस्त्रांनी वार करुन त्याचा खून केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या गुन्ह्यातील संबंधितांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२१-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) होय, सदर प्रकरणी वरणगाव पोलीस ठाणे, ता. भुसावळ येथे सीसीटीएन नं. ११५/२०२१ भा. दं. वि कलम ३०२,३२३,५०४, ३४ सह आर्म अॅक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी एक आरोपी अल्पवयीन आहे. अल्पवयीन आरोपीस बालसुधार कक्ष, जळगाव येथे पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## बुलढाणा व अकोला जिल्ह्यांमध्ये बनावट डिझेलची विक्री होत असल्याबाबत

**(४०) ३११८५ (१८-०६-२०२१). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व अकोला जिल्ह्यात रिटेल पॉईंटच्या माध्यमातून बायोडिझेलच्या नावाखाली बनावट डिझेलची विक्री होत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध बनावट डिझेल अत्यंत ज्वलनशील असल्याने यासाठी पेट्रोलिअम एक्सप्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशनचा परवाना असल्याशिवाय त्याचा साठा व विक्री करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बायोडिझेलची विक्री करण्याकरिता आवश्यक असलेले विविध ११ परवाने संबंधितांकडे नसल्याने सदरहू सर्व बायोडिझेल केंद्रे तातडीने बंद करण्याची कार्यवाही करणेबाबत नियंत्रण वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक वैमाशा-११/बायोडिझेल पंप/२०२१/३९१ दिनांक १ मार्च, २०२१ अन्वये सर्व संनियंत्रक, वैध मापन शास्त्र यांना आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत बुलढाणा जिल्हा पेट्रोल पंप डिलर असोसिएशन, बुलढाणा यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान तसेच वाशिम अकोला पेट्रोलिअम डिलर्स असोसिएशन, अकोला यांनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी बुलढाणा व जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे तक्रार निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अपर जिल्हादंडाधिकारी, बुलढाणा यांनी त्यांचे पत्र क्रमांक गृहविभाग कक्ष ४(२)/कावि/४०५/२०२१, दिनांक १५ एप्रिल, २०२१ अन्वये बुलढाणा जिल्ह्यातील सर्व उपविभागीय दंडाधिकारी यांना ३ दिवसांचे आत अहवाल सादर करण्याचे तसेच उपविभागीय दंडाधिकारी व निरीक्षण कार्यालय, खामगांव यांचे पत्र क्रमांक जा.क्र./अ.क्र.प्र./१९३/२०२१ नुसार दिनांक २१ मे, २०२१ अन्वये अवैध डिझेल विक्री बंद करण्याबाबत आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू अवैध व बनावट डिझेल विक्री तातडीने बंद करण्याबाबत तसेच सदरहू बनावट डिझेल विक्री करणारे व त्यांना सहाय्य करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (२१-०९-२०२१) :** (१) बायोडिझेलच्या नावाखाली बनावट डिझेलची विक्री होत असल्याबाबत बुलढाणा जिल्हा पेट्रोल पंप डिलर असोसिएशन यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे दि.१६.०४.२०२१ च्या पत्रान्वये तर वाशिम अकोला पेट्रोलियम डिलर्स असोसिएशन यांनी जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे दि.२१.०५.२०२१ रोजी तक्रार दाखल केली होती.

(२) हे खरे आहे.

(३) या विभागाची मान्यता न घेता अवैधरित्या सुरु झालेले बायोडिझेल केंद्र बंद करण्याबाबत नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१ मार्च, २०२१ च्या पत्रान्वये सर्व सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र यांना कळविले आहे.

(४) व (५) हे खरे आहे.
(६) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी दि.०१.०६.२०२१ च्या पत्रान्वये बायोडिझेल तपासणीकरिता उपविभागीय अधिकारी व सर्व तहसीलदार यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात दोन ठिकाणी तपासण्या करण्यात आल्या असून बायोडिझेल विक्री केंद्र चालकांना नोटीस बजावण्यात आली आहे.
तसेच मौजे सुटाळा (बु), ता.खामगाव, जिल्हा बुलडाणा येथे तपासणी करण्यात आली असून आढळलेला पदार्थ बायोडिझेल नसून बनावट डिझेल किंवा इंडस्ट्रीयल ऑईल असण्याची शक्यता प्रयोगशाळेकडून नमूद केल्याने अशा बनावट डिझेल विक्री केंद्रावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दि.१५.०४.२०२१, दि.२८.०५.२०२१ व दि.१८.०६.२०२१ च्या पत्रान्वये सर्व उपविभागीय अधिकारी यांना कळविले आहे.

शासन निर्णय दि.११ मे, २०२१ अन्वये बायोडिझेल संदर्भात धोरण निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये अवैधरित्या विक्री करणा-यांवर कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच राज्यात बायोडिझेलची अथवा बनावट डिझेलची अवैध विक्री करणाऱ्यांविरुध्द या विभागातील अधिकारी/कर्मचारी व तेल कंपन्यांचे भेसळ विरोधी पथक यांच्या संयुक्त पथकाव्दारे तपासणीकरिता संयुक्त मोहिम राबवून तेल कंपन्यांच्या MDG (Marketing Discipline Guidelines) च्या धर्तीवर कारवाई करण्याबाबतच्या सूचना दि.१८.०८.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात**

**(४१) ३२१६६ (११-०८-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दि.२३/३/२०१७ रोजी वेतन भत्यांचे दायित्व देण्याचे मान्य केले असून सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात वित्त विभागाकडे सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा. मुख्यमंत्री, मा. वित्त मंत्री तसेच मा.पाणी पुरवठा मंत्री यांनी एकत्रितपणे कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, ट्रेझरी मार्फत कर्मचारी/सेवानिवृत्त कर्मचारी-अधिकारी यांचे वेतन भत्ते, सहाव्या वेतन आयोगातील २४ वर्षाची कालबद्‌ध पदोन्नती व सुधारित वाहतुक भत्ता आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांना ग्रॅच्युअटी, अंश राशीकरण, रजा रोखीकरण, भविष्य निर्वाह निधी, जी.एस.एल.आय., सेवानिवृत्तीच्या दिवशी रजा रोखीकरण व भविष्य निर्वाह निधीची रक्कम देणे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या, अनुकंपा भरती आदी प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-१०-२०२१) :** (१) दिनांक २३.३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचा-यांच्या वेतन भत्यांचे दायित्व शासनाने स्विकारलेले आहे. दिनांक २३.९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.

(२) प्राधिकरणातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांच्या वेतन/सेवानिवृत्ती वेतनासाठी प्राधिकरणाला शासनाकडून दरवर्षी अनुदान दिले जाते.

(३) प्राधिकरणातील कर्मचा-यांचे वेतन / सेवानिवृत्ती वेतन कोषागारामार्फत होण्यास तांत्रिक अडचणी आहेत. सहाव्या वेतन आयोगातील २४ वर्षांची कालबद्ध पदोन्नतीची योजना अन्य सार्वजनिक प्राधिकरणांना लागू केली नसल्यामुळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देखील लागू करता आलेली नाही. प्राधिकरणातील कर्मचा-यांना सुधारित वाहतुक भत्ता मंजूर करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीविषयक लाभ दीर्घकाळ प्रलंबित न ठेवण्याच्या सूचना प्राधिकरणाला दिनांक २२.६.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. सन २०२०-२१ मध्ये प्राधिकरणाने एकूण २१३ अधिकारी / कर्मचा-यांना पदोन्नत्या दिल्या आहेत. तसेच सन २०१७ ते २०१९ या कालावधीत प्राधिकरणाने एकूण १७५ पदांची अनुकंपा भरती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४२) ३२२२९ (११-०८-२०२१). श्री.श्यामसुंदर शिंदे (लोहा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी कर्मचारी संघाच्या शिष्टमंडळाने सहकार मंत्री यांचेकडे दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीसह इतर मागण्यांचा विचार करण्यासाठी सह संचालक पणन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याच्या सूचना संबधित अधिका-यांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समिती स्थापन करण्यात आली आहे काय, समितीत कोणाकोणाचा समावेश करण्यात आला आहे तसेच समितीस अहवाल सादर करण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेऊन व इतर मागण्या पूर्ण होण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२४-०९-२०२१) :** (१) व (२) होय
(३) व (४) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत श्री विनायक कोकरे, सहसंचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०१.२०२१ च्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमध्ये उपसंचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांची सदस्य सचिव तसेच विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सातारा, धुळे, अमरावती, परभणी) असे एकुण पाच सदस्य, महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ यांचे दोन सदस्य व महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ यांचा एक सदस्य या सदस्यांचा समावेश आहे. समितीने त्यांचे कामकाज सुरु केले असून बाजार समित्यांकडून आवश्यक माहिती मागविण्यात आली आहे. तथापि, कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे बाजार समित्यांमध्ये कर्मचारी पुर्ण क्षमतेने उपलब्ध नसल्याने सदरची माहिती बाजार समितीकडून उपलब्ध होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि.०९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर गठीत अभ्यास समितीस त्यांचा अहवाल सादर करण्यासाठी दि.३१.०१.२०२२ पर्यत मुदतवाढ दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## चिखली व बुलढाणा (जि. बुलढाणा) येथील शाळा व अंगणवाडीवर नळ जोडणी देण्यात आल्या नसल्याबाबत

**(४३) ३२२६५ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या जलजीवन योजने अंतर्गत प्रत्येक शाळा, अंगणवाडया मध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नळ जोडणी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखली आणि बुलढाणा (जि. बुलढाणा) तालुक्यात अद्याप कोणत्याच शाळा / अंगणवाडीवर नळ जोडणी देण्यात आली नाही, हे ही खरे काय,
(३) असल्यास, अद्याप नळ जोडणी न देण्याची कारणे काय आहेत तसेच यास जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०९-२०२१) :** (१) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील सर्व शाळा व अंगणवाडी केंद्रांमध्ये नळाद्वारे गुणवत्तापुर्ण शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरीता दि.०२.१०.२०२० पासून विशेष मोहिमेची सुरवात करण्यात आली आहे.
(२) केंद्र शासनाच्या IMIS प्रणालीवरील दि.१२.०८.२०२१ रोजीच्या स्थितीनुसार बुलढाणा तालुक्यातील २६२ अंगणवाडी केंद्रांना तर २१५ शाळांना नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. तर चिखली तालुक्यातील ३२२ ग्रामीण अंगणवाडी केंद्रांना व २२९ ग्रामीण शाळांना नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील सिरम कंपनीला लागलेल्या आगीबाबत**

**(४४) ३२२७५ (०४-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : तारांकित प्रश्न क्रमांक २२२४९ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करोनाच्या प्रतिबंधासाठी लस बनविणाऱ्या सिरम कंपनीच्या कार्यालयाला आग लागल्याने दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास खूप मोठे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लागलेली आग घातपात असू शकतो अशी शक्यता असल्याने याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार चौकशीचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उक्त लागलेल्या आगीमध्ये जीवित व आर्थिक नुकसान झाल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सिरम कंपनीमध्ये लागलेल्या आगीबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे अकस्मात जळित रजिस्टर नंबर ०३/२०२१ अन्वये नोंद करण्यात आलेली आहे. चीफ फायर ऑफिसर, एम.आय.डी.सी., मुंबई यांनी वेल्डिंगच्या स्पार्कच्या संपर्कात ज्वलनशील पदार्थ व थर्मल इन्सुलेशन आल्याने आग लागल्याचा निष्कर्ष काढला आहे.
(३) सीरम इन्स्टिट्यूटकडून सदर दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रु.२५ लाख सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे. तसेच, औद्योगिक न्यायालयात वैधानिक प्रदान रु.७४.७४ लक्ष इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रंथालयांचे थकीत अनुदान मिळण्याबाबत व त्या अनुदानात वाढ होणेबाबत**

**(४५) ३२२९५ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२१४९ शासनमान्य ग्रंथालये असून ग्रंथालयांना देय असलेल्या अनुदाना पैकी ४७ कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थकीत अनुदान तातडीने देण्यात यावे तसेच अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री तथा नियोजन व वित्त मंत्री, महाराष्ट्र शासन आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे केली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१), (२) व (३) सन २०२०-२१ मधील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या थकीत अनुदानासाठी रु. ४६.३४ कोटी इतकी रक्कम शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.७.२०२१ व दि. २०.८.२०२१ अन्वये वितरीत करण्यात आली आहे. तसेच शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या अनुदानासाठी रु.१.०२ कोटी इतकी रक्कम शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. २१.६.२०२१ व दि. १३.८.२०२१ अन्वये वितरीत करण्यात आली आहे.

ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ करण्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, कोविड १९ च्या महामारीमुळे होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०४.५.२०२० व दि.२४.६.२०२१ निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार अनिवार्य खर्चामध्ये आवर्ती अथवा अनावर्ती स्वरुपांची वाढ होईल अशा प्रकारच्या कोणत्याही नवीन बाबी विभागांनी प्रस्तावित करु नयेत, अशा सूचना आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील रेमेडिसीवीर इंजेक्शनच्या सुरू असलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४६) ३२३१० (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बुलडाणा जिल्ह्यासह इतर ठिकाणी कोरोना वरील उपचारासाठी असलेल्या रेमडीसीवीर इंजेक्शनचा अनेक ठिकाणी काळाबाजार होऊन सदर इंजेक्शन फार मोठ्या किंमती मध्ये विकली गेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरात विशेषतः बुलडाणा जिल्ह्यात रेमडीसीवीरचा काळाबाजार करणाऱ्यांना पकडण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२७-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (3) खरे आहे. बुलढाणा जिल्ह्यात रेमडेसिवीरचा काळाबाजार करणाऱ्यांना पकडण्यात आले असून २ प्रकरणांमध्ये प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल केले आहेत. पोलिसामार्फत तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: पुणे जिल्हा व पुणे शहरातील मतदारसंघनिहाय सार्वजनिक वितरण व्यवस्था व दक्षता समितीची स्थापना करण्याबाबत**

**(४७) ३२३२३ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही विधानसभा क्षेत्रात विशेषत: पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात मागील एक वर्षापासून परिमंडल निहाय सार्वजनिक वितरण व्यवस्था व दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ रोजी व त्या दरम्यान च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गोरगरीब नागरिकांना सवलतीच्या दरात व रास्त भावात अन्नधान्य मिळावे याकरिता अन्नधान्य वितरण विभागाच्यावतीने शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागात तहसीलदार कार्यालय व शहरी भागात परिमंडळ अधिकारी यांच्यामार्फत रास्त भाव दुकानामार्फत नागरिकांना अन्नधान्य वितरण, नवीन शिधापत्रिका देणे, शिधापत्रिकेतील नाव कमी करणे, शिधापत्रिकेतील नावात वाढ करणे इत्यादी कामे करण्यात येतात हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धन्य वाटपाच्या सनियंत्रण व दक्षतेकरिता तसेच वाटप व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे , लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळणे व नागरिकांची गैरसोय टाळण्याकरिता राज्यातील सर्व २८८ विधानसभा सदस्यांच्या अध्यक्षतेखाली अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग यांच्या दिनांक २३ जानेवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये परिमंडळ निहाय सार्वजनिक वितरण व्यवस्था व दक्षता समिती गठित करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर समितीमध्ये महिला सदस्य, शिधा वाटप कार्यक्षेत्रातील नगरसेवक, रास्तभाव धान्य दुकानदाराचा प्रतिनिधी, ग्राहक चळवळी संबंधित प्रतिनिधी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे प्रतिनिधी यांच्या नियुक्त्या करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुणे जिल्हा, पुणे शहर तसेच इतर मतदारसंघात सार्वजनिक वितरण व्यवस्था व दक्षता समितीची स्थापना करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२३-०९-२०२१) : (**१) हे खरे नाही. दक्षता समित्या या स्थायी स्वरुपाच्या समित्या असून शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२० अन्वये दक्षता समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे. शिधापत्रिकेतील नाव कमी करणे, नाव वाढ करणे इत्यादी कामे तालुका स्तरावरुन नियमित केली जातात.
(४) होय, हे खरे आहे.
(५) होय, हे खरे आहे.
(६) पुणे जिल्ह्यात १ जिल्हास्तरीय दक्षता समिती, ११ तालुकास्तरीय दक्षता समिती, ११ नगरपालिका स्तरावरील समित्या गठीत झालेल्या आहेत.उर्वरीत समित्या गठीत करावयाची कार्यवाही चालू आहे.

तसेच अन्न धान्य वितरण अधिकारी, पुणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील परिमंडळ कार्यालय ज, ड व ई विभागाच्या दक्षता समितीवर अशासकिय सदस्यांची नियुक्ती झाली असून उर्वरित ८ परिमंडळ विभागाच्या दक्षता समितीवर अशासकिय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (सर्वसाधारण शाखा) यांचेमार्फत सुरु आहे. तसेच शासन परिपत्रक दिनांक २०/०८/२०२१ अन्वये दक्षता समित्या हया स्थायी समित्या असून दक्षता समितीच्या नियमित मासिक बैठका घेणेबाबत सदर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या सर्व परिमंडळ कार्यालयांना कळविण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी-बो-हाडेवाडी येथील न्यायालयाच्या पहिल्या टप्प्यातील बांधकामाचा प्रस्ताव निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) ३२३४५ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरात न्यायालयाच्या मोशी - बोऱ्हाडेवाडी येथे प्राधिकरणाकडून भाडेतत्वावर घेतलेल्या १६ एकर जागेत घर उभारण्यात येणाऱ्या न्यायालय इमारतीचे नवीन इमारत बांधकाम करण्याचे काम मध्यम मुदतीच्या आराखड्यात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोशी-बोऱ्हाडेवाडी येथील न्यायालयाचे नऊ मजली इमारत व न्यायाधीश राहण्याची व्यवस्था असलेला बांधकाम नकाशा मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नवीन न्यायालय इमारतीच्या पहिल्या टप्प्यातील तीन मजली इमारतीच्या बांधकामाकरिता १२४ कोटीचा निधी देण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मोशी - बोऱ्हाडेवाडी येथील न्यायालयासाठी नवीन इमारत बांधकाम करण्याच्या पहिल्या टप्प्यातील निधीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (२०-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी न्यायालयीन इमारती व न्यायाधीश निवासस्थानांच्या बांधकामाचा आराखडा शासनास सादर केलेला आहे. सदर आराखड्यात बांधकामांची लघु मुदतीची बांधकामे, मध्यम मुदतीची बांधकामे व दिर्घ मुदतीची बांधकामे अशी विभागणी करण्यात आलेली आहे. तसेच त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. पिंपरी-चिंचवड येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम सदर आराखड्यामध्ये मध्यम मुदतीमध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पिंपरी-चिंचवड येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाचा एकूण रु.१२४.०५ कोटी इतक्या किंमतीचा प्रस्ताव व नकाशा शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावामध्ये इमारतीच्या बांधकामाच्या प्रथम टप्प्यातील तळमजला+ ४ मजले इतक्या बांधकामाचा समावेश आहे. प्रथम टप्प्यामध्ये न्यायालयांचे बांधकाम करण्यात येणार आहेत.

सदर प्रस्ताव व नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागास तांत्रिक तपासणीसाठी सादर करण्यात आला असता, त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

(३) अंशत: खरे आहे. सदर इमारतीच्या पहिल्या टप्प्यात तळमजला + ४ मजल्यांचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.११७.४६ कोटी इतक्या किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार सदर किंमतीस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) सदर इमारतीचे बांधकाम न्यायालयीन इमारतींच्या आराखड्यात मध्यम मुदतीमध्ये दर्शविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत आराखड्यातील लघु मुदतीच्या बांधकामांना प्राधान्यक्रमाने प्रशासकीय मंजूरी देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तद्नंतर, तसेच मध्यम मुदतीतील बांधकामांना प्राधन्यक्रमाने प्रशासकीय मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सबब, न्यायालयीन बांधकामाच्या आराखडयात दर्शविलेल्या मध्यम मुदतीच्या बांधकामांमधील प्राधान्यक्रमानुसार, पिंपरी-चिंचवड जिल्हा पुणे येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**राज्य सरकारी सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ३२३६१ (०४-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्य सरकारी सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तिकेसाठीच्या अर्जात अनलॉक कालावधीत अर्थात ऑगस्ट, २०२० ते फेब्रुवारी, २०२१ दरम्यान तब्बल साडे सात हजार सेवा पुस्तिका अर्ज पुणे व मुंबईतील कोकण विभाग कोषागार कार्यालयात प्राप्त झाले असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवा पुस्तिकांची पडताळणी प्रलंबित असल्याने हजारो कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन प्रलंबित असून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्तीच्या अगोदर तीन महिन्यांचे वेतन रोखण्यात येत असल्याने त्यांना पुन्हा सेवा पुस्तिकेच्या पडताळणीसाठी वाट पहावी लागत असल्याने त्यांना किमान ६ महिने निवृत्ती वेतन, विमा व अन्य सर्व अर्थिक लाभांपासून वंचित रहावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवा पुस्तिकेच्या पडताळणीसाठी पुरेशा प्रमाणात कर्मचारी उपलब्ध करून वेळेत सेवा पुस्तिका पडताळणीसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०९-२०२१) : (**१) अंशत: खरे आहे. मार्च,२०२१ अखेर प्रलंबित सेवापुस्तकांची संख्या ३८३३ आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सेवापुस्तकांच्या पडताळणीसाठी अतिरिक्त कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औदयोगिक प्रशिक्षण संस्थाचा सुधारित निकाल जाहीर झाल्याबाबत**

**(५०) ३२३७५ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी ट्रेड मध्ये प्रशिक्षणासाठी शासकीय आणि खाजगी आयटीआय मध्ये दाखल झालेल्या सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांचा गत सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेला निकाल दिनांक ३० मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या एनसीव्हीटीच्या एम आय एस प्रणाली वर जाहीर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डी जी इ टी ने जाहीर केलेल्या निकालात अनेक विद्यार्थ्यांना प्रस्तावित एकुण गुणांपेक्षा जादा गुण देण्यात आल्याचे तसेच आयटीआयच्या अनेक प्रशिक्षणार्थींनी मिळालेल्या जादा गुणांबाबत निदेशकांना माहिती दिल्याचेही निदर्शनास आले आहे हे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयटीआयच्या प्रशिक्षणात फॉरमॅट असेसमेंट अर्थात सत्र गुणात अभियांत्रिकी ट्रेड आणि बिगर अभियांत्रिकी ट्रेड करिता एकूण प्रस्तावित गुणांपेक्षा ज्यादा गुण देण्यात आल्याने प्रशिक्षणार्थी सह निदेशक व पालकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आयटीआयच्या अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी ट्रेडमधील प्रशिक्षणाचा सुधारित निकाल जाहीर करण्याबाबत तसेच सदर प्रकरणाची चौकशी करून आयटीआयच्या विद्यार्थ्यांना जादा गुण देणाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२७-१०-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे
(२) नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.